सेंन्ट्रल हिंन्दू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे,

**भोसला मिलिटरी कॉलेज,**

रामभूमी, नासिक—४२२००५

**दिंनाक-05/10/2023**

# वरिष्ठ / कनिष्ठ महाविदयालयातील विदयार्थ्यांसाठी

# शैक्षणिक वर्ष 2023-24 शिष्यवृत्ती फॉर्म

## भरण्याबाबत महत्वाची सूचना

- शैक्षणिक वर्ष **2023-24** मध्ये विदयार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज खालील दिलेल्या संकेतस्थळावर भरणे बंधनकारक आहे.
- विदयार्थ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवरुन अर्ज भरावेत.
- **ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची अंतिम तारीख 31/10/2023 आहे.**
- **विदयार्थ्यांस स्कॉलरशिप व फ्रिशिपसाठी आधारकार्ड नंबर, मोबाईल नंबर व स्टेट बॅक ऑफ इंडियाचे खाते क्रमांक NPCI लिंक केलेले बंधनकारक आहे.**
- सदर आधारकार्ड नंबरशी लिंक असलेले मोबाईल नंबर व स्टेट बॅक ऑफ इंडियाचे किंवा इंडीया पोस्ट बॅंक खाते कुठल्याही प्रकारे बंद होणार नाही किंवा बदलणार नाही तसे झाल्यास विदयार्थ्यांस स्कॉलरशिप व फ्रिशिप मिळणार नाही यांची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.
- सदर स्कॉलरशिप व फ्रिशिप फॉर्म करिता विदयार्थ्यांचा स्वतःचा मोबाईल नंबर आधार नंबर, स्टेट बॅक ऑफ इंडियाचे खाते क्रमांक, ई-मेल आय डी आवश्यक आहे. पालकांचे मोबाईल नंबर, स्टेट बॅक ऑफ इंडियाचे खाते क्रमांक किंवा सायबर कॅफेचे मोबाईल नंबर किंवा ई-मेल आय डी देवू नये.
- ऑनलाइन फॉर्म भरताना खालील **सर्व मुळ कागदपत्रे (Original Document)** स्कॅन व्दारे वेगवेगळी पी डी एफ करून 250 के बी च्या आत साईज असलेली पीडीएफ ऑनलाईन पध्दतीने अपलोड करावी.
- ऑनलाइन फॉर्म भरताना विदयार्थ्यांचा कलर फोटो (Original Document) स्कॅन व्दारे जेपीजी करून 250 के बी च्या आत साईज असलेली जेपीजी पध्दतीने अपलोड करावी.
- महाविदयालयात अर्ज जमा करतेवेळी सोबत मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी (Verification)सादर करावी. मुळ कागदपत्रे महाविदयालयात जमा होणार नाही.
- **विदयार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना अचुक माहिती भरावी तसेच कागदपत्रे अपलोड करताना सोबत दिलेल्या सुचने प्रमाणे फक्त मुळ कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावी.**

- ➢ विदयार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना चुका झाल्यास त्यास सर्वस्वी विदयार्थी जबाबदार राहील व सदर विदयार्थ्यांस स्कॉलरशिप व फ्रिशिप मिळणार नाही याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**<u>ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतेवेळी मुळ कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक आहे झेरॉक्स प्रत अपलोड केल्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही याची विदयार्थ्यानी नोंद घ्यावी.</u>**

**<u>ऑनलाईन पध्दतीने भरलेला अर्ज महविदयालयात जमा करताना खालील क्रमानुसार कागदपत्रे जोडून दयावीत.</u>**

1. स्कॉलरशिप व फ्रिशिपच्या अर्जाची प्रत
2. विदयार्थ्यांचे आधार कार्ड
3. 31 मार्च 2023 पर्यंत वैध असलेले तहसिलदार किंवा सेतु कार्यालयाने निर्गमित उत्पन्नाचा दाखला.
    - ✓ 31 मार्च 2023 पर्यंत वैध असलेले तहसिलदार किंवा सेतु कार्यालयाने निर्गमित केलेला वडीलांचा दाखला (फॉर्म नंबर 16 चालणार नाही )
    - ✓ वडील मृत असल्यास वडीलांचा मृत्युचा दाखला व आई/पालक यांचा उत्पन्नाचा दाखला.
    - ✓ वडील वेगळे रहात असल्यास आई/वडीलांचे घटस्पोटाचे कागदपत्रे व आई/पालक यांचा उत्पन्नाचा दाखला.
    - ✓ वडील वेगळे रहात असल्यास आई /वडील यांचे 100 रुपयांच्या बॉन्डपेपरवर दाखला व आई/पालक यांचा उत्पन्नाचा दाखला.
4. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी दाखला (Age & Domicile Certificate) -तहसिलदाराचा किंवा सेतु कार्यालयाने निर्गमित केलेले.
5. विदयार्थ्यांच्या जातीच्या दाखल्याची प्रत
6. शैक्षणिक वर्ष 2022-23 चे गुणपत्रक
7. महाविदयालयातून प्राप्त केलेली प्रवेश पावतीची प्रत
8. शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत
9. रेशनकार्डाची प्रत

10.विदयार्थ्यांच्या बँक पासबुक STATE BANK OF INDIA / POST BANK प्रत एम आय सी आर कोड व आय एफ एस कोड सहीत.

11.विदयार्थ्यांच्या आधारकार्ड नंबरशी लिंक (NPCI-National Payments Corporation of India) असलेले STATE BANK OF INDIA/ POST BANK खाते क्रमांकाची पावताची प्रत

10 OBC/SBC/NT-A/B/C/D विदयार्थ्यांसाठी त्यांचे स्वतःचे नॉन क्रीमिलिअर प्रमाणपत्र प्रत

11 विदयार्थी ऑनलाईन/ ऑफलाईन वर्गास 75 टक्के उपस्थितीबाबतचे स्वयं घोषणा पत्र

12 लहान कुटुंबाचे प्रतिज्ञा पत्र

13 बीबीए, बीएस्सी संगणकशास्त्र, एमएस्सी संगणकशास्त्र व एम सी जे वर्गासाठी जातपडताळणी प्रमाणपत्राची प्रत

14 शैक्षणिक खंड असल्याचे खंड पत्र (Gap Certificate)

- शिष्यवृत्ती व फ्रिशपसाठी अर्ज केलेल्या विदयार्थ्यांनी त्यांचा फार्म https://mahadbt.maharashtra.gov.in या पोर्टलवर वेळोवेळी लॉगीन करून तपासुन संबधीत अर्ज केलेल्या फॉर्मचा आढावा घेणे आवश्यक आहे.

- शिष्यवृत्ती व फ्रिशपसाठी अर्ज केलेल्या विदयार्थ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in या लॉगीन करून apply Scheme वर जावून Application ID वर क्लीक केल्यावर विदयार्थ्यांच्या फॉर्मची History दिसेल त्यानुसार विदयार्थ्यांने आपली त्रुटी असल्यास ऑनलाईन पध्दतीने त्रुटी पुर्तता विदयार्थ्यांनी करणे बंधनकारक आहे. अन्यथा शिष्यवृत्ती/फ्रिशिप न मिळाल्यास त्यास सर्वस्वी विदयार्थी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

**ऑनलाईन शिष्यवृत्ती व फ्रीशिपच्या फॉर्मसोबत सर्व मुळ कागदपत्रे अपलोड करावी. झेरॉक्स कागदपत्रे अपलोड करु नये. सर्व मुळ कागदपत्रांच्या आधारे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व फ्रीशिप फॉर्मची ऑनलाईन तपासणी होणार आहे.**

**ऑनलाईन भरलेले शिष्यवृत्ती व फ्रीशिपचे फॉर्म जमा करण्यासंदर्भात सविस्तर सुचना महाविदयालयाच्या सुचना फलकावर लावण्यात येईल याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**प्राचार्य**
**भोसला मिलिटरी कॉलेज,**
**रामभूमी, नाशिक**